दिनांक १०/६/२०१६

# —: मुंबई पोलीस भरती २०१५—१६ :—

## —: अंतिम गुणवत्ता यादीत निवड झालेल्या उमेदवारांना वैद्यकीय चाचणी व साक्षांकन नमूना भरण्यांबाबत सूचना :—

➢ अंतिम गुणवत्ता यादीत निवड झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय चाचणी दि.१६/०६/२०१६ ते २०/०६/२०१६ पुरूष उमेदवार व दि.२१/०६/२०१६ व दि.२२/०६/२०१६ रोजी महिला उमेदवारांची अर्ज क्रमांकाप्रमाणे पोलीस कल्याण संकुल, नायगाव येथे सकाळी ०८.०० ते दुपारी १२.३० व दुपारी १.०० ते सायंकाळी ०६.०० या वेळेत करण्यात येईल.

➢ वैद्यकीय तपासणी 'महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१, आणि महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश)नियम २०११' यामधील तरतुदीनुसार करण्यात येईल.

➢ वैद्यकीय चाचणीत १) दृष्टीदोष २) तिरळेपणा ३) रातआंधळेपणा ४) वर्णाधितेपणा ५) गुडघ्यास गुडघा लागणे ६) सपाट तळवे ७) त्वचा रोग ८) छातीचे रोग ९) तोतरेपणा या चाचण्यांचा समावेश असून या चाचण्यांमध्ये दोष आढळल्यास उमेदवारास अपात्र ठरवून त्याची निवड रद्द करण्यात येईल. याबाबत पोलीस भरतीच्या जाहिरातीत स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

➢ वैद्यकीय चाचणीस अर्ज क्रमांकानुसार बोलावण्यात येईल.

➢ वैद्यकीय चाचणीसाठी येताना यापूर्वी मैदानी चाचणीच्या वेळी व लेखी परिक्षेच्या वेळी दिलेली दोन्ही प्रवेशपत्रे सोबत आणावीत. सदर प्रवेशपत्रे नसल्यास, वैद्यकीय चाचणीसाठी प्रवेश दिला जाणार नाही. लेखीचे प्रवेशपत्र हरवल्यास किंवा फाटल्यास, दुय्यम प्रवेशपत्र कोणत्याही परिस्थितीत दिले जाणार नाही.

➢ वैद्यकीय चाचणीस येताना अलीकडील कालावधीतील चार पासपोर्ट आकाराचे फोटो व सर्व मूळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे न चुकता सोबत आणावीत.

➢ वैद्यकीय चाचणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांना निवडपत्र देण्यात येईल.तसेच निवडपत्रासोबत उमेदवारांना देण्यात आलेल्या सांक्षाकन नमुन्यातील माहिती भरून ३ दिवसाच्या आंत या कार्यालयास (मध्यवर्ती भरती कक्ष, नायगांव, दादर, मुंबई ) येथे सादर करणे बंधनकारक राहिल. साक्षांकन नमुन्यात भरून दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळल्यास निवड रद्द करण्यात येईल.

- निवडपत्र हे अंतिम नियुक्ती आदेश नाहीत याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

- निवडपत्र प्राप्त झाले म्हणून नियुक्तीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही व दावा करता येणार नाही.

- उमेदवाराने साक्षांकन नमुना भरण्यापूर्वी काळजीपूर्वक वाचणे व समजून घेणे आवश्यक आहे.

- वैद्यकीय चाचणीत 'तातपुरते अपात्र' ठरविण्यात आलेल्या उमेदवारांना पोलीस शल्यचिकित्सक यांच्या शिफारशीनुसार सर जे.जे. समूह रूग्णालयातील संबधीत वैद्यकीय मंडळाकडे / विभागाकडे पुढील तपासणीसाठी पाठविण्यात येईल. त्यात पात्र ठरल्यास, त्यांना निवडपत्र व साक्षांकन नमुना देण्यात येईल.

- वैद्यकीय चाचणीसाठी उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. त्यासाठी उमेदवारास कोणताही प्रवास खर्च दिला जाणार नाही.

- वैद्यकीय चाचणीच्या वेळी उमेदवाराने कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकारांचा अवलंब केल्यास त्यांना अपात्र ठरवून त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

- पोलीस भरतीतील प्रत्येक प्रक्रियेबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

- पोलीस शिपाई भरती प्रक्रियेअंतर्गत वैद्यकिय चाचणी अथवा पुढील प्रक्रियेसंदर्भात कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरूपाची मागणी केल्यास उमेदवाराने त्याबाबतची माहिती ॲन्टी करप्शन ब्युरो, मुंबई यांना ०२२—२४९२१२१२ व (टोल फ्री) १८००२२२०२१ या दूरध्वनी क्रमांकावर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी.

- वैद्यकिय चाचणी अथवा पुढील प्रक्रियेत गैरप्रकार होत असल्याचे निदर्शनास आल्यास, उमेदवार सदर बाब संबंधित पोलीस अधिकाऱ्यांच्या/वरिष्ठांच्या निदर्शनास आणून देवू शकतील.

**सही/—**

**( अनुप कुमार सिंह )**

**अध्यक्ष, पोलीस भरती समिती २०१५—१६ तथा**

**सह पोलीस आयुक्त ( प्रशासन ),**

**मुंबई**